RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२७३ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.४ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## हरलेल्या १६० जागांवर दिग्गज नेत्यांच्या सभा भाजप निवडणुकीच्या रिंगणात उतरला

### राम मंदिर सोहळा, लोकसभा निवडणूक एकाच वेळी तयारी

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली :**

भारतीय जनता पक्ष सध्या पूर्णपणे निवडणुकीच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे. अयोध्येतील राममंदिर आणि लोकसभा निवडणुका या दोन्हींची तयारी पक्षाकडून सुरू करण्यात आली आहे. गेल्या वेळी लोकसभा निवडणुकीत हरलेल्या १६० जागांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या सभांचे नियोजन करण्यात आले आहे.



'अब की बार... ४०० पार', 'तीसरी बार... मोदी सरकार' अशा निवडणुकीच्या घोषणा देत पक्षाने संपूर्ण पक्षसंघटनेला निवडणुकीच्या तयारीला लावले आहे. अयोध्येतील राममंदिराचा कार्यक्रम आणि लोकसभा निवडणुका या दोन्हींसाठी भाजपने एकाच वेळी तयारी केली आहे. भाजपला लोकसभा निवडणुकीत राममंदिराचा फायदा मिळण्याची शक्यता आहे; त्यामुळे अयोध्येच्या राममंदिराच्या माध्यमातूनच निवडणूक जिंकण्याचा मार्ग शोधण्याची तयारी पक्षाने सुरू केली आहे, असे सूत्रांनी सांगितले.

**अशी आहे तयारी...**

पक्षाचे चार प्रमुख नेते गेल्या निवडणुकीत गमावलेल्या १६० जागांवर निवडणूक रॅलींचा मॅरेथॉन कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. राममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर या १६० जागांवर या चार नेत्यांच्या मॅरेथॉन निवडणूक सभांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या तीन ते चार जागांचे गट करण्यात आले असून प्रत्येक गटात या चार नेत्यांपैकी एकाची निवडणूक रॅली होणार आहे.

**विजयाचा मार्गही अयोध्येतूनच**

२५ जानेवारी ते २५ मार्च या काळात देशातील भाविकांना अयोध्या येथील राममंदिरात नेण्याची तयारी आणि लोकसभा निवडणुकीची तयारी या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होणार आहेत. लोकसभा निवडणुकीत दोन्हींच्या एकत्रित तयारीचा भाजपला फायदा होईल, असा विश्वास पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे. तर लोकसभा निवडणुकीत विजयाचा मार्गही अयोध्येतूनच जाईल, असा विश्वास पक्षाला आहे.

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची तब्येत बिघडल्यामुळे आजची सुनावणी रद्द

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

राष्ट्रवादी आमदार अपत्रता प्रकरणावरील गुरुवार ४ जानेवारी रोजीची सुनावणी रद्द झाल्याची माहिती सूत्रांनी दिलीये. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची तब्येत बिघडल्यामुळे ही सुनावणी रद्द झाल्याचं सांगण्यात आलंय. पण



वेळेअभावी या सुनावणीचे वेळापत्रक आजच तयार होणार असल्याची माहिती देखील सूत्रांनी दिलीये. त्यामुळे आज दिवसाअखेर सुनावणीचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. पण राष्ट्रवादी दोन्ही गटांच्या मान्यतेनंतरच वेळापत्रकानुसार सुनावणी अपेक्षित आहे.

सध्या विधासभा अध्यक्षांच्या कोर्टात शिवसनेच्या आमदार अपत्रता प्रकरणावर सुनावणी सुरु आहे. त्यातच आता राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी लवकरच सुरु होईल. पण या सुनावणीला देखील सध्या ब्रेक लागण्याची शक्यता असल्याचं म्हटलं जातंय. कारण जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात ही सुनावणी होणं अपेक्षित होतं. पण आता या सुनावणीचं वेळापत्रक आल्यानंतरच तारीख निश्चित होणार असल्याची माहिती देण्यात आलीये. त्यामुळे आता या प्रकरणावरील सुनावणीला कधी वेग येणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

**निवडणूक आयोगात सुनावणी सुरू**

दुसरीकडे राष्ट्रवादी कोणाची, पक्षावर दावा कुणाचा यावर निवडणूक आयोगात सुनावणी सुरु आहे. अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात भूमिका मांडण्यात आली आहे. अजित पवार आणि शरद पवार गटाचा एकमेकांवर बनावट शपथपत्रं सादर केल्याचा आरोप केला आहे. राष्ट्रवादी पक्षाची स्थापना शरद पवारांनी केली, मग त्यांच्याशिवाय पक्ष कसा काय असू शकतो असा सवाल शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी उपस्थित केला आहे. तर सुप्रिया सुळे यांच्या कार्याध्यक्षपदाची नियुक्ती चुकीची असल्याचा युक्तिवाद अजित पवार गटाकडून आतापर्यंत करण्यात आला आहे.

## दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दुधासाठी सरकार देणार ५ रुपयांचं अनुदान



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. दुधाला अनुदान देण्यासंदर्भात मंत्रीमंडळ बैठकीत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. दुधासाठी सरकार ५ रुपयांचं अनुदान देणार आहे. त्यामुळं पाच रुपयांच्या सबसिडीसह दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३२ रुपयांचा दर मिळणार आहे. हा दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा म्हणावा लागेल. ३२ रुपयाचा दर ठरल्यास दूध संघांना शेतकऱ्यांना २७ रुपये प्रति लिटर दर द्यावा लागणार आहे.

**नागपूर अधिवेशनात मंत्री विखे पाटलांनी केली होती घोषणा**

राज्यातील सहकारी दूध संघांमार्फत संकलित होणाऱ्या गाईच्या दूधासाठी दूध उत्पादकास प्रतिलिटर ५ अनुदान देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात केली होती. ही योजना राज्यातील फक्त सहकारी दूध उत्पादक संस्थांमार्फत राबवण्यात येणार असल्याचे विखे पाटील म्हणाले होते. मात्र, घोषणेनंतर याबाबतचा कोणताही आदेश अद्याप निघाला नव्हता. दरम्यान, आज मंत्रीमंडळाच्या बैठकीत दूध उत्पादक शेतकऱ्यांना पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ७२ टक्के दूध खासगी संस्थांना दिले जाते आणि सरकारनं दिलेलं अनुदान फक्त सहकाराला आहे.त्यामुळं बहुतांश दूध उत्पादक शेतकरी वंचित राहणार आहेत. त्यामुळं सरकारनं सर्वांना अनुदान द्यावं, अशी मागणी किसान सभेनं केली होती.

दरम्यान, डीबीटीकरण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे बँक खाते हे त्याच्या आधार कार्डशी आणि पशुधनाच्या आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे. त्याची पडताळणी करणं आवश्यक राहील. ही योजना दिनांक १ जानेवारी २०२४ ते दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ या कालावधीसाठी लागु राहणार आहे.

त्यानंतर आवश्यकतेनुसार आढावा घेवून मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. ही योजना आयुक्त ( दुग्धव्यवसाय विकास ) यांच्या मार्फत राबविली जाणार आहे. याबाबतीत शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आले होते. मात्र, सहकारी बरोबरच खासगी संस्थांना दूध घालणाऱ्या शेतकऱ्यांना देखील अनुदान देण्यात यावं अशी मागणी वारंवार केली जात होती.

## महाराष्ट्रातला हिरवा आणि दुतोंडी साप आहे जितेंद्र आव्हाड

### शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के,नवनीत राणा,परवीन पोटे यांनी जितेंद्र आव्हाडांवर साधला निशाणा



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

प्रभू श्रीराम हे बहुजनांचे होते, तसेच ते मांसाहारी होते, असं विधान शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले. जितेंद्र आव्हाड यांच्या या विधानावरुन राज्यासह देशात वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपाने देखील जितेंद्र आव्हाडांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. याचदरम्यान शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी जितेंद्र आव्हाडांवर निशाणा साधला आहे.

नरेश म्हस्केंनी आज ठाण्यात पत्रकार परिषद घेतली. जितेंद्र आव्हाड यांना महाराष्ट्रात हिरवा साप आणि दुतोंडी साप म्हणतात. ते रात्रीचे ट्विट करतात सकाळी डिलीट करतात रात्री त्यांची अवस्था काय असते हे त्यांच्यासोबत काम करणाऱ्यांना विचारा, अशी टीका नरेश म्हस्के यांनी केली आहे. लोकांची माथी भडकवण्याचं काम जितेंद्र आव्हाड करत आहेत, असा आरोप नरेश म्हस्के यांनी केला आहे.

जितेंद्र आव्हाडांच्या विरोधात जेव्हा आम्ही आंदोलन करायचो तेव्हा आम्हाला मातोश्रीवरून जितेंद्र आव्हाड यांना सांभाळून घ्या, असे फोन यायचे. जितेंद्र आव्हाड आपल्यातच येणार आहेत असं सांगितलं जायचे एवढा मातोश्रीचे जितेंद्र आव्हाड यांच्या विषयी प्रेम होते, असा दावा देखील नरेश म्हस्के यांनी केला आहे. खुर्चीसाठी मातोश्री ने हिंदुत्व सोडलेलं आहे. त्यांनी त्यांच्या जितेंद्र आव्हाड यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल बोलावं, भूमिका मांडावी, असं आव्हान देखील नरेश म्हस्के यांनी दिलं आहे.

### आव्हाडांना आग्रा येथील पागलखान्यात पाठवा - नवनीत राणा



प्रभू श्रीराम हे मांसाहारी होते, असं विधान शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले. जितेंद्र आव्हाड यांच्या या विधानावरुन राज्यासह देशात वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांनी जितेंद्र आव्हाडांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे आव्हाडांना आग्रा येथील पागलखान्यात पाठवावे त्याची जाण्याची व्यवस्था आम्ही करून देतो . जो राम का नही वो किसी काम का नही असेही त्या या वेळी म्हणाल्यात.

### त्या काळात आव्हाड बकरी होते का? - आ. प्रवीण पोटे



प्रभू श्रीराम हे मांसाहारी होते, असं विधान शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले या विधानावर आमदार पोटे यांच्यावर संताप व्यक्त करीत कोण जितेंद्र आव्हाड ? हाच संशोधनाचा विषय आहे. ज्या रामाला सगळा देश मानतो आणि त्यांना आव्हाड मांसाहारी आहे असं म्हणत असेल तर मग अव्हाड त्या वेळी बकरी होते का रामाच्या इतिहासात लिहल आहे कि त्यांनी कंद मुळे खाऊन त्यांनी वनवास भोगला आहे. हा आमच्या आस्थेचा प्रश्न आहे त्यांनी यावर बोलू नये.

## १७० ची तूर डाळ १३० वर, दर घसरल्यानं सर्वसामान्यांना दिलासा मात्र, शेतकऱ्यांना फटका

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सर्वसामान्यांपासून ते श्रीमंताच्या किचनमध्ये लागणाऱ्या तूर डाळीचे दर हे गगनाला भिडले होते. किरकोळ बाजारात तूरडाळ १७० रुपये किलोपर्यंत पोहोचली होती. मात्र, सध्या तूर डाळीच्या दरात मोठी घसरण झाली आहे. आता हेच दर कमी होऊन १३० रुपये प्रती किलोपर्यंत कमी झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यामुळं सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळत आहे. तर दुसरीकडं शेतकऱ्यांना या दर



घसरणीचा फटका बसत आहे. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहेत.

सध्या खरीपात लागवड केलेली नवीन तूर बाजारात दाखल होत आहे. अशातच तुरीच्या दरातही घसरण होत आहे. अशातच केंद्र सरकारनं विदेशातून तूर आयात केली आहे. याचा परिणाम दरांवर झाल्याचं चित्र दिसत आहे. असे असले तरी तुरीचे दर घसरल्यानं शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. आधी कमी पाऊस आणि त्यानंतर अवकाळी पावसाचे संकट आणि त्यानंतर बुरशीजन्य आजार आणि कीड आळ्याचा प्रादुर्भावामुळं तूर पिकाला मोठा फटका बसला होता.

## मराठी विद्यापीठ येत्या जूनपासून सुरु होणार : पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

### रिध्दपूर येथील थीम पार्कची पालकमंत्र्यांकडून पाहणी

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

रिध्दपूर येथे येत्या जूनपासून सुरु होणाऱ्या मराठी विद्यापीठ स्थापनेच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीला वेग द्यावा, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी आज रिध्दपूर येथे दिले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. पाटील यांनी आज रिध्दपूर येथील मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेसाठी थीम पार्क परिसराची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार डॉ. अनिल बोंडे यांची प्रमुख उपस्थिती यावेळी होती. नियोजित मराठी भाषा विद्यापीठ समिती सदस्य महंत कारंजेकर बाबा, गोविंद्रप्रभू तीर्थस्थान सेवा समितीचे सचिव महंत वाईंदेशकर तसेच मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीपकुमार पवार, तहसीलदार नरेश आकनुरी, गोविंद गुरुकुल आश्रम शाळेचे सचिव सुभाष पावडे, मुख्याध्यापक संजय कोहळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मराठी भाषा विद्यापीठाची प्रस्तावित जागा थीम पार्कची पाहणी करताना श्री. पाटील म्हणाले की, येत्या जून २०२४ पासून मराठी भाषा विद्यापीठ सुरु करण्यात येईल. त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी. विद्यापीठ



स्थापनेच्यादृष्टीने अभ्यासक्रम, कुलगुरुंची निवड, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधा तसेच आवश्यक बाबींची पुर्तता लवकरात लवकर करण्यात यावी. या विद्यापीठाबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी विशेष कॅम्पेन आयोजित करण्यात यावे. विद्यार्थी निवडीचे निकष, अभ्यासक्रम आदींबाबत लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना दिले. येथील म्हाइंभट सभागृह, ज्ञानकेंद्र, भक्तनिवारा आदींची पाहणीही श्री. पाटील यांनी यावेळी केली.

मराठी भाषा विद्यापीठ सुरु व्हावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून होती. महानुभाव पंथ प्रवर्तक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे योगदान अमुल्य आहे. त्यांच्या अमुल्य भाषिक योगदानामुळे मराठी साहित्याची गंगोत्री रिध्दपूर ठरली आहे. यामुळे रिध्दपूर ही महानुभाव पंथाची सोबतच मराठी भाषेचीही काशी आहे. 'लिळाचरित्रा'सारखा आद्य ग्रंथ जेथे लिहिला गेला त्या स्थानाचे महत्त्व लक्षात घेऊन शासनामार्फत येत्या जूनपासून रिध्दपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ सुरु करण्यात येणार आहे. मराठी भाषा विद्यापीठात विविध ज्ञानशाखा, शिक्षणक्रम आणि अभ्यासक्रम राबविताना विद्यार्थी रोजगारक्षम कसे होतील, याचाही विचार करण्यात आला असल्याचे पालकमंत्री श्री. पाटील यावेळी म्हणाले.

## संपादकीय ......

# रामा रामा, गजब हुई गवा रे

राज्यात रामराज्य यावे, अशी जनतेची अपेक्षा आहे आणि अयोध्येत राममंदिर उभे राहत आहे, याचा आनंद आहे, असे सांगत आपल्या तालुक्यातील गावागावात अक्षता कलशाचे स्वागत उत्साहाने आणि भक्तिभावाने करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे. जयंत पाटील हे सध्या तरी शरद पवार यांचे खंदे समर्थक आहेत, त्यामुळे जयंत पाटील यांनी अक्षता कलशाच्या स्वागताचे आवाहन केल्यामुळे जरा आश्चर्यच वाटले आणि रामा रामा, गजब हुई गवा रेया गाण्याची आठवण झाली.

शरद पवार यांनी अयोध्येतील राममंदिराच्या संदर्भात नेहमीप्रमाणे शेरेबाजी केली असून या विषयावरून भारतीय जनता पक्षाला नेमके काय साधायचे आहे, असा सवाल त्यांनी गेल्या आठवड्यात केला होता. तसेच, २२ तारखेला अयोध्येत राम मंदिरात होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा विषयावर बोलताना सामान्यपणे पूजाअर्चा होते, असा ठिकाणी मी जात नाही, असे वक्तव्यही शरद पवार यांनी गेल्याच आठवड्यात केले होते. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्याच पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांनी अक्षता कलशाचे स्वागत करण्याचे आवाहन केल्याने आश्चर्यच वाटले.

पूजाअर्चेला शरद पवार यांचा विरोध आहे तर ते आता अक्षता कलशाचे स्वागत करण्याचे आवाहन केल्याबद्दल जंयत पाटील यांना समज देणार काराज्यात रामराज्य यावे, ही जनतेची अपेक्षा आहे, असे जयंत पाटील यांना वाटते तर शरद पवार आता जंयत पाटलांना प्रदेशाध्यक्ष या पदारून दर करून त्यांचे निष्ठावान सेक्युलर जितेन्द्र आव्हाड यांना प्रदेशाध्यक्षपदी नेमणार का जयंत पाटील मनाने महायुतीच्या बरोबरच आहेत आणि त्यांच्यामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार रखडला आहे, असे विधान शिवसेनेचे आमदार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिन्दे यांचे समर्थक संजय शिरसाट यांनी केले आहे. त्याला उत्तर देताना जयंत पाटील यांनी आपण मनाने कोठे आहोत, याविषयी संजय शिरसाट यांच्याशी कधीच बोलणे झालेले नाही, असे सांगत हा विषय टाळला आहे. त्याचे कारण असे की शिरसाट यांची भेट होणे आणि त्यांच्याशी बोलताना आपण मनाने महायुतीबरोबर आहोत, असे जयंत पाटील यांनी सांगणे शिरसाट यांना अपेक्षितच नव्हते. पण, शब्दांचे खेळ करण्यात, कोट्या करण्यात जयंत पाटील वाकबगार असल्याने शिरसाट यांनी विचारलेल्या प्रश्नाला आणि केलेल्या विधानाला त्यांनी बगल दिली आहे. पण, तरीही अक्षता कलशाबद्दल त्यांनी केलेल्या आवाहनामुळे जयंत पाटील यांच्या मनात नेमके काय सुरू असेल, याचा अंदाज खचितच लावता येईल.

सध्याच्या परिस्थितीत गल्ली ते दिल्ली अशा सर्व पातळ्यांवर येत्या पंधरवड्यात राममंदिराला थेट विरोध करणे, हे भल्याभल्यांना शक्य नाही. फारूक अब्दुल्ला यांच्यासारख्यांनीही राम कोणाची मक्तेदारी नाही, असे सांगत रामभक्ती व्यक्त केली आहे. त्यामुळे आपल्या मतदारसंघात एकीकडे अक्षता कलशाचे स्वागत करण्याचे सर्व नागरिकांना आवाहन करणारे जयंत पाटील आपल्या दुभंगलेल्या राष्ट्रवादीचे सेक्युलर अध्यक्ष शरद पवार यांना या अक्षतांचे आणि राममंदिराचे महत्त्व समजावून सांगणार काकिंबहुना, राममंदिराचे गुणगान नाही केले तरी प्रथमग्रासे मक्षिकापातःची आठण करून देणारी विधाने तरी टाळा, हे समजावून सांगणार का

शरद पवार यांचे गेल्या साठ वर्षातील वाखाणण्यासारखी विश्वासार्हता लक्षात घेता ते राम मंदिर या विषयावरील भूमिकाही सातत्यापूर्ण ठेवतील का, याविषयी शंकाच आहे. त्याचे साधे कारण असे की सातत्याने भूमिका बदलणे, हीच पवार यांच्या राजकारणाची भूमिका राहिलेली आहे. कदाचित, जयंत पाटील यांना राज्यात रामराज्य यावे, ही जनतेची अपेक्षा असल्याचा साक्षात्कार झाला आहे, तसाच तो शरद पवारांनाही उद्या होईल, कुणी सांगावे?

# राज्यातील पहिला गौकुंभ अमरावतीत

## चारही शंकराचार्य उपस्थित राहणार

### १५ ते २१ फेब्रुवारी दरम्यान आयोजन



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक –** मनुष्यप्राणी, जनकल्याण, विश्वकल्याण यांच्यासाठी आतापर्यंत अनेक महाकुंभ व सहस्रचंडी यज्ञांचे आयोजन करण्यात आले. परंतु राष्ट्रमाता अशी मान्यता मिळावी, या उद्देशाने गौमातेसाठी राज्यातील पहिला महाकुंभ अमरावती जिल्ह्याच्या केकतपुर येथे भरवला जाणार आहे. हा महाकुंभ व सहस्रचंडी यज्ञ आगामी १५ ते २१ फेब्रुवारी या काळात होईल. त्यासाठीची जय्यत तयारी सुरु असल्याचे महाराष्ट्राचे गौदूत संत माधवदास महाराज यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत सांगितले.महाकुंभासाठी चारही पिठाचे शंकराचार्य, देशभरातील संत–महंत आणि गौमातेसाठी झटणार्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील, असेही यावेळी सांगण्यात आले. अमरावती–मोर्शी रस्त्यावरील केक्तपुर येथे सिद्ध बाल हनुमान संस्था आणि लक्ष्मीनारायण गौधाम आहे. या गोधामच्या परिसरात १०० एकर जागेत हा गौकुंभ व सहस्रचंडी महायज्ञ होणार आहे. गौमातेला राष्ट्रमातेची मान्यता मिळवून देण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून देशभर चळवळी सुरु आहेत. वेळोवेळी त्यासाठी आंदोलनेही केली गेली. त्याचेच फळ म्हणून शासनाने गोहत्याबंदी कायदा केला. परंतु, त्या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याने देशभर अनर्थ सुरु आहे, असेही यावेळी सांगण्यात आले. गौमातेला राष्ट्रमातेची मान्यता मिळवून देण्यासाठीच्या आंदोलनाचाच एक भाग म्हणून हा गौकुंभ भरवण्यात येत असल्याचे माधवदास महाराज यांनी सांगितले. गौमाता ही राष्ट्र, धर्म, संस्कृती व अखंड विकासाची जननी असून तिचे रक्षण ही आम्हा सर्वांची जबाबदारी आहे. या गौकुंभाला श्री शारदापीठम् द्वारका, श्री ज्योतिर्मठ बद्रीकाश्रम, श्री श्रृंगेरीशारदापीठ व श्री गोवर्धनपीठ पुरी येथील शंकाराचार्य उपस्थित राहतील. पत्रकार परिषदेला संत माधवदास महाराज यांच्यासह जेष्ठ पत्रकारा प्रदीप देशपांडे, श्रीमंत शिवानंद पुरी महाराज, महंत सुरेशानंद गिरीजी, महंत प्रेमानंद गिरीजी व जगदंबनाथ महाराज, गोसेवक अजीत जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

# सुनील केदार यांचा कारागृहातील मुक्काम जैसे थे, हायकोर्टाने सरकारला मागितले जामिनावर उत्तर



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक नागपूर: –** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये १५० कोटींपेक्षा जास्त रकमेचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा करणारे माजी मंत्री सुनील केदार यांचा कारागृहातील मुक्काम सध्या जैसे थे आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील न्यायमूर्ती उर्मिला जोशी–फलके यांनी बुधवारी राज्य सरकारला नोटीस बजावून केदार यांच्या शिक्षा निलंबन व जामीन अर्जावर येत्या ६ जानेवारीपर्यंत लेखी उत्तर दाखल करण्याचा आदेश दिला आणि या प्रकरणावर ९ जानेवारी रोजी पुढील सुनावणी निश्चित केली.

२२ डिसेंबर रोजी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने केदार यांना विविध गुन्ह्यांतर्गत दोषी ठरवून कमाल पाच वर्षे सश्रम कारावास व एकूण १२ लाख ५० हजार रुपये दंड, अशी शिक्षा सुनावली आहे. त्यानंतर केदार यांनी शिक्षा निलंबन व जामिनासाठी सत्र न्यायालयात दाखल केलेला अर्ज गेल्या ३० डिसेंबर रोजी फेटाळण्यात आला. परिणामी, केदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम ३८९(२) अंतर्गत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ते गेल्या २८ डिसेंबरच्या रात्रीपासून मध्यवर्ती कारागृहात कैद

# दर्यापूर व अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विविध विकास कामाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा



**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** २३येथील दर्यापूर व अंजनगाव तालुक्यातील विविध विकास कामाची पाहणी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी नुकतीच केली. यावेळी दर्यापूर व अंजनगाव सुर्जी तहसिल कार्यालयातील विविध विभागनिहाय आढावा घेवून प्रलंबित कामे मार्गी लावण्याचे निर्देश श्री. कटियार यांनी दिले.

दौऱ्या दरम्यान दर्यापूरचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणकर, तहसिलदार डॉ. रविंद्र कानडज, अंजनगाव सुर्जीचे तहसिलदार पुष्पा सोळंके दाभेराव, नगर परिषद मुख्याधिकारी प्रशांत डरकुडे, पंचायत समिती सहायक गटविकास अधिकारी तसेच आरोग्य अधिकारी आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दर्यापूर तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यांच्या प्रस्तावीत स्थळाची पाहणी केली. त्यानंतर मौजे इटकी येथील रोहयो अंतर्गत गुरांचे गोठे, वृक्ष लागवड व नरेगातील अंगणवाडी बांधकामाची पाहणी केली. त्यानंतर अंजनगाव सुर्जी तालुक्यामधील मौजे विहीगांव येथील तलाठी कार्यालयाचे बांधकामाची पाहणी केली. तसेच महाराजस्व अभियानांतर्गत सुरु असलेल्या कामाचे व शासकीय वसुलीबाबत आढावा घेतला. त्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांचे दैनंदिनी कामकाजाचा आढावा घेतला. विविध कामासाठी तहसिलदार कार्यालयात आलेल्या नागरिकांच्या तक्रारी जाणुन घेवून त्यावर नियमानुसार कार्यवाही विनाविलंब करण्याचे निर्देश संबधितांना दिले.

अंजनगाव सुर्जी येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या बांधकामाची पाहणी केली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. त्यानंतर नगर परिषद अंजनगाव सुर्जी प्रांगणातील मिनि अग्रिशमण वाहणाचे उद्घाटन श्री. कटियार यांचे हस्ते करण्यात आले. मौजे चौसाळा–निमखेड बाजार येथील लोकवर्गणीतून होत असलेल्या कामाबाबत जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त करून उपस्थित शेतकरी व नागरिकांना प्रोत्साहित केले.




## रिकाम्या पोटी प्या आवळ्याचा रस; अनेक गंभीर समस्यांपासून होईल सुटका

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक** आवळा आरोग्यासाठी खूप फायदेशीर समजला जातो. आवळ्याच्या रसात व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, आयरन ,अँटीऑक्साइड भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे आवळ्याला औषधाचा दर्जा देण्यात आलेला आहे. आवळ्याचा रस आपण घरच्या घरी बनवूनसुद्धा घेऊ शकतो. आवळा पचनसंस्थेसाठी फायदेशीर आहे. अशा वेळी रिकाम्या पोटी आवळ्याच्या रसाचे सेवन केले तर त्याचे अनेक फायदे होतील.

**१. साखर ते युरिक ऍसिडसाठी फायदेशीर–** आवळ्याचा रस नियमितपणे रिकामी पोटी घेत असल्याने शरीर डिटॉक्स करते. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण असते. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती मजबूत राहण्यास मदत होते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण व यूरिक ऍसिड कमी होते. रक्तामध्ये गोठलेली चरबी कमी करण्यासाठी आवळा फायदेशीर आहे. यासाठी रोज सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यात सेवन केले पाहिजे.

**२. त्वचेवरील डाग कमी करण्यासाठी फायदेशीर–** आवळ्यामुळे त्वचेच्या समस्या दूर होण्यास मदत होते. तुम्ही दररोज रिकाम्या पोटी आवळ्याचा रस पिऊ शकता किंवा चेहऱ्यावर तो रस लावू शकता. त्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग कमी होतात.

**३. केसांना काळे करते–** आवळा केसांसाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. केसांना मजबूत करण्यासाठी आवळ्याचा वापर करतात. तसेच जर पांढरे केस काळे करायचे असेल तर आवळ्याचा वापर उपयोगी ठरेल. त्यासाठी केसांना आवळ्याचा रस लावा आणि एक ते दोन तास राहू द्या. त्यानंतर साध्या



पाण्याने धुवा असे केल्याने केस काही दिवसांत मजबूत आणि काळभोर होतील.

**४. दृष्टी सुधारण्यासाठी–** डोळ्यात जर जळजळ असेल, खाज येत असेल, पाणी येणे यांसारख्या समस्या दूर करण्यासाठी तुम्ही आवळ्याचा वापर करू शकता. तसेच रोज रिकाम्या पोटी आवळ्याचा रस पिल्याने या समस्या दूर होतील आणि तुमच्या दृष्टीत सुधारणा होईल.

**५. या आजारांसाठी आवळ्याचा रस फायदेशीर आहे–** खोकला, ताप, जुलाब, अपचन, मोतीबिंदू, नाकातून रक्त येणे, कावीळ कुष्ठरोग, बद्धकोष्ठता इत्यादी आजारांपासून बचाव करण्यासाठी रोज सकाळी रिकाम्या पोटी आवळ्याचा रस घेणे खूप फायदेशीर आहे.

# स्वस्त दराने रेती मिळविण्यासाठी ऑनलाईन नोंदणी सुरु



**दि.४विदर्भ प्रजासत्ताकअमरावती,** १६राज्यातील सामान्य नागरिकांना स्वस्त दराने रेती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार धामणगाव रेल्वे तालुक्यातील मौजे जळगाव मंगरूळ येथील वाळूडेपो कार्यान्वित करण्यात आले असून जवळच्या सेतू केंद्रावर किंवा वेबसाईटवर वाळू बुकिंग सुरु झाली आहे, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी डॉ. इम्रान शेख यांनी दिली.

वाळू बुक करण्यासाठी https://mahakhanij.maharashtra.gov.in या वेबसाईटवर कार्यप्रणाली उपलब्ध करुण देण्यात आली आहे. प्रतिब्रास रक्कम ६०० रूपये जिल्हा खनिज प्रतिष्ठान रक्कम ६० रूपये तसेच महाखनिज इटीपी चार्ज रक्कम १६.५२ रूपये असे एकुण रक्कम ६७६.५२ रूपये प्रतिब्रास शासकीय फी असून रेती व वाळूची आपल्या बांधकामापर्यंत वाहतुकीचा खर्च नागरिकांना स्वतः करावा लागेल. तसेच प्रधानमंत्री आवास योजना व इतर राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत घरकुल बांधकामासाठी ५ ब्रास पर्यंत वाळू रेती विनामुल्य प्राप्त करता येईल. तथापि, वाळू रेतीच्या वाहतुकीच्या खर्च संबंधित लाभार्थ्यांस करावा लागेल.

सद्यस्थितीत जिल्ह्यात धामणगाव रेल्वे तालुक्यातील मौजे जळगाव मंगरूळ येथील वाळूडेपो कार्यान्वित झालेला असून मौजे चांदूर ढोरे, ता. तिवसा, मौजे धामंत्री ता. तिवसा, मौजे फत्तेपूर जावरा ता. तिवसा, मौजे नावेड ता. भातकुली व मौजे निंभारी ता. अचलपूर येथील वाळूडेपो सुध्दा कार्यान्वित करण्याची प्रक्रीया सुरू आहे. डेपो कार्यान्वित झालेनंतर त्यामधून सुध्दा रेती वाळू प्राप्त करता येईल.

# भाऊराव विधळे स्मृतिपित्यर्थ जवळा येथे प्रवेशद्वार,लोकार्पण,सोहळा संपन्न

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त लहान मुलांना कपडे, शालेय साहित्य, विविध वाटप उपक्रम राबवून सजला जवळा परिसर

**दि.४विदर्भ प्रजासत्ताकचांदुर बाजार–** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आदर्श विद्यालय जवळा शहापूर येथे स्वर्गवासी भाऊराव रामकृष्ण विधळे यांच्या स्मृती पित्यार्थ दिलीपराव विधळे यांच्या कडून प्रवेशद्वार शाळेला भेट देऊन लोकार्पण सोहळा चे आयोजन करण्यात आले होते वडिलांचे शाळेविषयी असलेले प्रेम ही आठवण जीवन भर राहावी या करिता मुलाने आपल्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करत सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेला भेट म्हणून प्रवेशद्वार दिले या निमित्य अनेक लोकांच्या उपस्थित लोकार्पण करण्यात आले या करिता आदर्श विद्यालय जवळा शहापूर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते या कार्यक्रमात गुणवत्ता विद्यार्थी चा सत्कार, गोर गरीब विद्यार्थी ला शालेय गणवेश, शालेय साहित्य वाटप, राज्य पातळीवर गेलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार असे विविध उपक्रम चे आयोजन सुद्धा या लोकार्पण सोहळ्यात मध्ये करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रियाताई देशमुख उपशिक्षण अधिकारी




जिल्हा परिषद अमरावती, प्रमोदराव राऊत पोलीस उपनिरीक्षक चांदुर बाजार , राजाभाऊ देशमुख अध्यक्ष बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था तळवेल,




सत्कारमूर्ती दिलीपराव विधळे, बाळासाहेब विधळे उपसरपंच, ज्योती चोरे प्राध्यापक गोसी टोम्पे महाविद्यालय चांदुर बाजार ,वर्षाताई ढोले आदी मान्यवर ,शाळेतील शिक्षक व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.–



# आयुष्य भरभरून जगा व तुमचा उद्देश पूर्ण करा - जया किशोरी

# सॅटेलाईट तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांना भरपूर संधी- वैज्ञानिक पंकज किल्लेदार

## पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथे टेकलॉन्स-२०२४ चे उदघाटन





## दहा हजार विद्यार्थ्यांची उपस्थिती



**दि.३ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - आयुष्य भरभरून जगा, तुमचा उद्देश पूर्ण करा आणि तुमच्याकडे जे काही चांगले आहे ते तुमचे भाग्य समजा त्याचप्रमाणे तुम्ही तुमच्या आयुष्यात घालवलेल्या वेळेचा विचार करून वेळ वाया घालवण्यात काही फायदा नाही. त्यापेक्षा पुढचा मार्ग कसा ठरवायचा याचे नियोजन करावे. असा मूलमंत्र मोटिव्हेशनल स्पीकर जया किशोरी यांनी आज पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथील स्वामी विवेकानंद ऑडिटोरिअम येथे १०००० पेक्षा जास्त अनुयायी व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिला. पी. आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप येथील विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या टेकलॉन्स २०२४ या आंतरराष्ट्रीय महोत्सवाचे उदघाटन इसरो चे वैज्ञानिक पंकज किल्लेदार व मोटिव्हेशनल स्पीकर जया किशोरीजी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी स्मार्ट वर्क आणि शॉर्टकटच्या भ्रमात राहू नये. शॉर्टकटच्या मागे धावण्याऐवजी काम समजून घेऊन आपले ध्येय ठरवून काम पूर्ण मेहनतीने करा तुमची उंची नाही तर तुमची नम्रता तुम्हाला महान बनवते त्याचप्रमाणे तुमच्यात कोणतेही गुण नसतील, पण तुम्ही एखाद्या विशिष्ट क्षेत्रात मनापासून मेहनत करत असाल तर तुम्हाला यश मिळवण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. यासाठी तुम्ही निवडलेला मार्ग योग्य आहे की नाही हे ओळखावे लागेल व आपले द्येय गाठावे लागेल असे मत जया किशोरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांकडून जया किशोरी यांना जीवन यशस्वी बनविण्याकरिता काही प्रश्न विचारले यावेळी विद्यार्थ्यांना समर्पक उत्तर देत जया किशोरीजी यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी जीवन जगण्याचा कानमंत्र दिले.

इसरो चे वैज्ञानिक पंकज किल्लेदार यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करतांना इसरो चा इतिहास इसरो मधील काम करतानाचे त्यांचे स्वतःचे अनुभव व इसरो ने बनविलेले विविध उपग्रह व त्यांच्या चाचण्या , इसरोच्या भविष्यातील योजना , विद्यार्थ्यांसाठी शिकण्यासाठी असणाऱ्या उपलबध्द संधी, विद्यार्थ्यांना इसरो कडून देण्यात येणारी इंटर्नशिप त्याचप्रमाणे इसरो द्वारे विद्यार्थ्यांनी बनविलेले छोटे छोटे सॅटेलाईट पी. एस. एल. व्ही द्वारे अवकाशात पाठविले जातात याबद्दल मार्गदर्शन केले. मा. पंकज किल्लेदार यांनी खडठज मधील तरुण प्रतिभेचे पालनपोषण करण्याची आपली वचनबद्धता व्यक्त केली. पुढच्या पिढीतील शास्त्रज्ञ आणि अभियंते यांना प्रेरणा देण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम, संशोधन उपक्रम आणि शैक्षणिक आउटरीच स्थापन करण्याच्या योजना त्यांनी मांडल्या.

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप या संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रविण पोटे पाटील यांनी इसरोचे वैज्ञानिक श्री पंकज किल्लेदार व जया किशोरी यांनी निमंत्रण स्वीकारल्याबद्दल विशेष आभार व्यक्त केले त्याचप्रमाणे वैज्ञानिक पंकज किल्लेदार यांच्या कार्याचा गौरव करत भविष्यातील इसरोचे महत्वकांक्षी प्रोजेक्ट यशस्वी होण्याकरिता शुभेच्छा दिल्यात तसेच जया किशोरी यांच्या उपदेशाचा फायदा हा सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय पूर्ण करण्याकरिता नक्की होईल असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी मंचावर पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप या संस्थेचे अध्यक्ष आ. श्री प्रवीण पोटे पाटील , संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व महाविद्यालयाचे उपप्राचार्य, सर्व महाविद्यालयीन डीन, सर्व विभागप्रमुख, टेकलॉन्स कोऑर्डीनेटर , स्टुडंट्स ऑर्गनायझर कमिटी, स्टुडंट्स टेकलॉन्स कोऑर्डीनेटर उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा जया किशोरीजी व पंकज किल्लेदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. टेकलॉन्स २०२४ कार्यक्रमाच्या उदघाटनानंतर सर्व आयोजित ऑनलाईन गेम, पेपर प्रेझेंटेशन, प्लेसमेंट टेस्ट, कटिया , प्रोजेक्ट अँड मॉडेल कॉम्पिटिशन, अन्वेन्शन, पोस्टर एक्झीबीशन , फ्लॉवर एक्झीबीशन ला सुरवात करण्यात आली यात हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# मालमत्तेचं रक्षण करणाऱ्या पदाधिकारी व कर्मचारी यांना पडला एन यु देशमुख यांच्या पुतळ्याचा विसर

## अखेर देशमुख समाज जागा होऊन गेले पुतळा पूजन

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताकदर्यापूर** - दर्यापूर तालुक्यामध्ये शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी निर्माण केलेली संस्था म्हणजे शेतकरी जिनिंग अँड प्रेसिंग फॅक्टरी दर्यापूर असून या संस्थेचा एकेकाळी कारभार अतिशय मोठा व शेतकऱ्यांच्या हितासाठी होता मात्र शासनाचे नियम बदलत गेले व त्यांनी यामध्ये पदाधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे या संस्थेला घरघर लागली अखेर गावातली मुख्य वस्तीत असलेली करोडो रुपयाची प्रॉपर्टी ही लाखो रुपयात विकून पुन्हा शिवर रोडवर नवीन प्रॉपर्टी घेण्यात आली त्यामध्ये लाखो रुपयाच्या मशीन घेण्यात आल्या मात्र त्याही सर्वाला पुन्हा घरघर लागली याच दरम्यान दर्यापूर मध्यवस्तीत त्यावेळेस त्या पदाधिकाऱ्यांनी राजकारणामध्ये एक मोठं नाव असलेलं व ज्या नावाने राजकारण्यांचा गट चालायचा ते नेतृत्व म्हणजे एन यु उपाख्य अण्णासाहेब देशमुख असून यांचा मध्यवस्तीत असलेला पुतळा मुळापासून काढून कार्यरत जागेमध्ये बसवण्यात आला त्या जागेचं सौंदर्यकरण करण्यात आलं हे सर्व काही झालं घर घर काही थांबली नाही व अखेर ती जागा सुद्धा पदाधिकाऱ्यांनी व्यवस्थापक गोकुळ पाटील भडांगे यांनी विकण्याचा निर्णय घेतला व



विकून मोकळे झाले पुतळा मात्र तिथेच सोडला अखेर पुतळा सुद्धा हलवायचा व नातेवाईकांच्या ताब्यात द्यायचा ठरला असताना पुन्हा देशमुख यांची अस्मिता जागी झाली आणि तो पुतळा पुन्हा त्याच जागेवर प्रस्थापित करण्यात आला इथपर्यंत ठीक आहे मात्र या संस्थेचे पदाधिकारी कार्यरत आहे कर्मचारी कार्यरत आहे पगार किंवा मानधन किंवा कमिशन काय जे घेत असतील ते घेत असताना त्या सर्वांना मात्र एन यु देशमुखांच्या पुतळ्याचा विसर पडला त्यांच्या पुण्यतिथी दिने साधा दहा रुपयाचा हार सुद्धा त्या पुतळ्याला घालण्यात आला नाही हे कितपट योग्य शोभनीय कृती आहे का अखेर संपूर्ण दिवस संपत असताना शेवटी सूर्यास्त होण्याच्या मार्गावर दिवस असताना पुन्हा देशमुख यांचे अस्मिता जागी झाली आणि सर्व एकत्रित येऊन त्यांनी एन यु उपाध्य अण्णासाहेब देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून सर्वांनी पुष्प वाहून अभिवादन केले आता तरी त्या पुतळ्याची अवस्था आहे त्या परिस्थितीत न ठेवता पुन्हा त्या जागेचे सौंदर्यकरण करावे कारण अद्याप पुतळ्याच्या शेजारी करोडो रुपयाची जागा शिल्लक आहे ती सुद्धा केव्हा विकतील याचा काही अंदाज नाही मात्र विकणाऱ्यांनी व घेणाऱ्यांनी त्या पुतळ्याची अवस्था अबाधित कशी राहील व्यवस्थित कशी राहील याकडे लक्ष द्यावे एवढीच साधी मागणी संबंधितांनी केली आहे.

# शकुंतला रेल्वे बचाव सत्याग्रहाच्या वतीने शकुंतला रेल्वे चा १११ वा वाढदिवस साजरा



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** - दर्यापूरला रेल्वे गेट जवळ दर्यापूर येथे शकुंतला रेल्वेचा १११ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. १९०९ साली शकुंतला रेल्वेचा सर्वे होऊन १९१३ साली पहिली रेल्वे या रुळावरून धावली होती. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे निमित्य साधून व बालिका दिनाचे औचित्य ठेऊन, बालिकांची झुकझुक चालणारी शकुंतला रेल्वे पूर्ववत सुरु राहावी.यासाठी दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा दीन दुबळ्या, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, कष्टकऱ्यांची शकुंतला रेल्वे सुरु झाली पाहिजे या लोकहिताच्या मागणी साठी ९९९ वर्ष सेवा दिलेल्या शकुंतला रेल्वेचा कृतज्ञता वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी विजय विल्हेकर, गजानन देवके, जनार्धन गावंडे, प्रकाश देशमुख, वर्षा अग्रवाल, मालनी पाटील, सुनिता मंडवे,सिन्धु विल्हेकर, नलिनी बुटे,सुशील गुरमाळे, संगीता नेहर,वर्षा बायसकार,दुर्गा नेहर,रेखा धांडे, विजया अतकरे, जयश्री होले,विजया साखरे, राजश्री आठवले, ताराबाई मोरे, हरिभाऊ ढोके,चंदाताई पोटे, बबन वानखडे,गजानन शेरेकर, सतीश रायबोले अभी बोरेकर,राजेश आठवले, गजानन चोरपागार ई. शकुंतला रेल्वे सत्याग्रही सहभागी झाले होते.-

# एकाच छताखाली सर्व सहकारी विभागाचे स्टॉल अनिवार्य

## आमदार खासदारांनी घेतला महाराजस्व अभियानाचा आढावा



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**- जिल्ह्यातील नागरिकांना विविध सरकारी योजनेचा लाभ एकाच छताखाली मिळावा, यासाठी आयोजित महाराजस्व अभियानात कार्यक्रमस्थळी एकाच छताखाली प्रत्येक सरकारी विभागाचा स्टॉल असावा, असे निर्देश खा. नवनीत राणा व आ. रवी राणा यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे अध्यक्षतेत पार पडलेल्या बैठकीत खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांनी महाराजस्व अभियानाच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.येत्या १२ जानेवारीलाशहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे महाराजस्व अभियान पार पडणार आहे. सर्वसामान्य जनता, शेतकरी व शेतमजूर यांची प्रलंबित कामे पूर्ण करणे, लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनेचा लाभ, विविध लाभाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविणे, त्या योजनांचा प्रसार- प्रचार करणे, हा उद्देश या आयोजनामागचा आहे. यासाठी आयोजनस्थळी सर्व सरकारी विभागाचे स्टॉल लावून प्रत्येक सरकारी योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळवून देण्याचे निर्देश सर्व विभाग प्रमुखांना देण्यात आले.या बैठकीला सीईओ पंडा, उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, रवींद्र जोगी, आशीष बिजवल, अधीक्षक अभियंता शिंदे, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त माया केदार, जिल्हा भूमि अभिलेख अधीक्षक श्रीकांत मुंडे, भूषण उमक, भोजराज पवार, डॉ. सुरेश आसोले, डॉ. सुभाष ढोले, पशुसंवर्धन अधिकारी पुरूषोत्तम सोळुंके, कृषी अधिकारी अजय तळेगावकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रफुल्ल कचवे, प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके, भूसंपादन अधिकारी दिलीप निपाने, उमेश टेकाळे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

# ईव्हीएम विरोधात राज्यभरात लढा उभा करणार : आनंदराज आंबेडकर

## अमरावती लोकसभा निवडणूक लढण्यास इच्छुक, इंडिया आघाडीशी चर्चा सुरु



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** - सध्या देशभरात नागरिकांमध्ये ईव्हीएमविरोधात संभ्रम आहे. त्यामुळे आगामी निवडणुका या सर्व बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी जोर धरत आहे; परंतु सत्तेत असलेले भाजपचे सरकार हे बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यास घाबरत आहे. त्यामुळे सध्या भाजपला मिळणारा विजय हा त्यांचा विजय नसून ईव्हीएमचा विजय आहे. त्यामुळे ५ जानेवारी रोजी रिपब्लिकन सेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन राज्यभरात ईव्हीएमविरोधात लढा पुकारणार असल्याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर यांनी बुधवारी पत्र परिषदेतून दिली.

आनंदराज आंबेडकरांनी अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी अशी रिपब्लिकन सेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांची इच्छा आहे. त्याअनुषंगाने आनंदराज आंबेडकर हे मागील दोन वर्षांपासून ते सातत्याने अमरावतीचा दौरा करत आहेत. भीमा कोरेगाव शौर्यदिनिमित्त आयोजित कार्यक्रमानिमित्त आनंदराज आंबेडकर हे दोन दिवसांपासून अमरावतीमध्ये आहेत. त्यामुळे त्यांनी पत्रकार परिषदेतून माध्यमांसमोर आपली भूमिका मांडली.

ते म्हणाले, सध्या देशाची वाटचाल ही हुकूमशाहीकडे होताना दिसून येत असून, सर्व सामान्य नागरिकांच्या विरोधातील कायदे संसदेत पारित करण्यात येत आहेत. त्यामुळे देशातील लोकशाही वाचवायची असेल तर सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. आम्ही इंडिया आघाडीसोबत जाण्यास तयार आहोत. यासाठी आम्ही त्यांना लोकसभेसाठी अमरावतीच्या एकाच जागेची मागणी करत आहोत आणि त्याअनुषंगाने इंडिया आघाडीतील काही वरिष्ठ नेत्यांशी चर्चादेखील सुरू आहे. स्थानिक पदाधिकाऱ्यांनी यासंदर्भात शरद पवार यांचीदेखील भेट घेतली आहे. त्यामुळे वेळेवर सर्व चित्र स्पष्ट होईलच; परंतु या बरोबर देशात भाजपला सत्तेबाहेर आणण्यासाठी ईव्हीएमविरोधात लढा उभारणे तितकेच महत्त्वाचे असून, लवकरच राज्यभरात हा लढा उभा करणार असल्याचेही आनंदराज आंबेडकर म्हणाले. यावेळी रिपब्लिकन सेनेचे विनायक दुधे, सतीश सियाले, ड. पी.एस. खडसे, बाळासाहेब वाकोडे उपस्थित होते.

# भाजपच्या स्वयंघोषित महिला पदाधिकाऱ्याविरुद्ध खासदार, आमदारांकडे तक्रार

## खासगी कामात अडथळा आणल्याने लाखोंचे नुकसान

### खासदार,आमदार यांच्या भूमीकीकडे लक्ष

**दि४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** देशातील सर्वात मोठा पक्ष म्हणून नावरूपास येणाऱ्या भारतीय जनता पक्षाचा फायदा घेत स्वयंघोषित महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष असल्या चा दावा करीत त्या महिलेने सामान्य नागरिकांचा छळ केल्याच्या तक्रारी वाढल्या आहे. प्रदेश उपाध्यक्ष असल्याचे सांगणार्या त्या महिलेने खाजगी कामात अडथळा आणून लाखो रुपयांचे नुकसान केल्याची लेखी तक्रार भाजपचे शहराध्यक्ष व आमदार प्रवीण पोटे तसेच खासदार व ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिल बोंडे यांच्याकडे केली आहे.

आमदार व भाजप शहराध्यक्ष प्रवीण पोटे तसेच खासदार व ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे मुकूंद बर्गी व कंत्राटदार सचिन रोडे यांनी लेखी तक्रार केली आहे. श्री कॉलनी मध्ये भूखंड क्रमांक १३ नजूल सीट क्रमांक ३१, मोजा बेनोडा, सर्वे क्रमांक ३८/२ मध्ये नुसार महापालिका प्रशासनाकडून इमारत बांधकाम आरंभ प्रमाणपत्र देण्यात आले असे ही त्यांनी म्हटले आहे. त्याठिकाणी ज्येष्ठ नागरिक मुकुंद बर्गी यांचे घर आहे. त्यांच्या पत्नीचे निधन झाले तर मुलगा बेरोजगार व पायाने आजारी आहे. हा भूखंड मुकुंद बर्गी यांच्या मालकीचा असून त्यांनी तो विकासक सचिन रोडे यांना हस्तांतरित केला आहे. त्यामुळे बर्गी परिवार हा सध्या भाड्याने राहत आहेत.

विकासकाने बर्गी यांचे जुने घर पाडून बांधकाम सुरू करताच भाजपच्या स्वयंघोषित महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष शिल्पा पाचघरे यांनी आता अडथळे आणण्यास सुरुवात केली. यासाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांचे निर्देश असल्याचे पत्र समोर करून प्रशासनावरही दबाव आणला आहे. वास्तविकता त्यांचे हे पत्र खोटे असल्याचे निदर्शनास येते. त्या भाजपच्या पदाधिकारी नसल्याचे वरिष्ठ पातळीवरून स्पष्ट करण्यात आले आहे, मात्र संबंधित महिलेने मंत्रालयातील पत्रोत्तर दाखवत सहाय्यक निबंधक व मनपा प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला आहे असा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.आता या प्रकरणात भाजपचे खासदार आणि आमदार काय भूमिका घेतात या कडे सर्वांचे लक्ष आहे.




## वर्ष सरले तरीही विदर्भ, महाराष्ट्र एक्स्प्रेसची 'लेटलतीफी' सुरूच

## प्रवासी त्रस्त, रेल्वे विभाग सुस्त



**दि.३विदर्भ प्रजसत्ताक गोंदिया :** – मागील वर्षभरा पासून गोंदियात सकाळी पोहोचणार्या विदर्भ एक्स्प्रेसचे व सायंकाळी पोहोचणार्या महाराष्ट्र एक्स्प्रेसचे वेळापत्रक पूर्णपणे ढासळले आहे. नवीन वर्षात तरी ते सुरळीत होईल, अशी अपेक्षा प्रवाशांना होती; पण गेले दोन दिवस नवीन वर्षातही या रेल्वेगाड्यांचा उशिरा येण्याचा रेकॉर्ड कायम आहे. या रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक रुळांवर येत नसल्याने प्रवासी त्रस्त; तर रेल्वे विभाग यावर तोडगा काढण्याऐवजी सुस्त असल्याचे चित्र आहे. महाराष्ट्र एक्स्प्रेसची गोंदिया रेल्वेस्थानकावर पोहोचण्याची वेळ सायंकाळी ६:३० वाजताची असून ती गाडी थेट रात्री १० ते १०:३० ला, तर सकाळी ११:१५ ची विदर्भ दुपारी एक वाजता गोंदिया स्थानकावर पोहोचत असल्याने प्रवाशांची डोकेदुखी वाढली आहे. मागील तीन चार दिवसांपासून या समस्येत अधिक वाढ झाली आहे. दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेचे गोंदिया रेल्वेस्थानक हे मध्यवर्ती ठिकाण आहे. या रेल्वेस्थानकावर दररोज हजारो प्रवासी रेल्वेने ये-जा करतात. काही मासिक पास काढून, तर काहीजण रेल्वेचा प्रवास सोयीचा आणि तिकिटाला परवडणारा असल्यामुळे खासगी वाहनांसह एस.टी. बसेसना फाटा देऊन रेल्वेने प्रवास करीत आहेत. मात्र बिघडलेल्या या रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक अजूनही रुळांवर आलेले नाही.

**विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार आणि सर्वसामान्यांना फटका**

रेल्वे गाड्यांच्या उशिरा धावण्या विषयी अनेकदा निवेदन देण्यात आले. प्रवाशांनी हल्ला- बोल देखील केला; परंतु, रेल्वे प्रशासनावर त्याचा कोणताही परिणाम होत नाही. त्यामुळे गाड्या दररोज विलंबाने चालत आहेत. त्याचा फटका मात्र विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार आणि सर्वसामान्य प्रवाशांनादेखील बसत आहे.

## सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्काराने दिलीपराव दुर्गे सन्मानित

### स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचा उपक्रम




**दि.३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार-२०२४ ,अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलींना उच्च शिक्षण देणारे माऊली जहागीर येथील श्री दिलीपराव दुर्गे यांना प्रदान करण्यात आला.पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री वल्लभ फाउंडेशन आणि मधुरम स्कूलचे व्यवस्थापकीय संचालक श्रीमती डॉ.कुंजन वेद यांच्यासह सौ.रंजना दुर्गे उपस्थित होत्या. मुलगा - मुलगी असा कोणताही भेद न करता अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी धडपड करणार्या पालकांना दरवर्षी महाविद्यालयाच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या नावाने आदर्श पालक पुरस्कार, सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो.३००१ रुपयांचा धनादेश, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २०१४ पासून सदर पुरस्कार महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी स्त्री शिक्षणाला चालना देणार्या पालकांना देण्यात येतो. यावर्षीच्या पुरस्कार वितरण समारंभाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुरस्कार वितरण समितीचे समन्वयक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी पुरस्कार वितरणामागची भूमिका प्रास्ताविकातून विशद केली. त्यानंतर श्री दिलीपराव दुर्गे यांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.कुंदन वेद यांनी आपल्या भाषणातून महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतिक करीत महाविद्यालयातील मुलींनी कोणत्याही परिस्थितीत न डगमगता खंबीरपणे सर्व जबाबदार्या पार पाडीत पुढे जावे आणि स्त्री ही अबला नसून ती सक्षम आहे हे आपल्या कार्यातून सिद्ध करावे असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय दरणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाच्या वतीने मुलींच्या विकासासाठी राबविण्यात येणार्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. सुभाष पवार यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.पी.आर. जाधव ,प्रा. राजेश ब्राह्मणे, डॉ. श्रीकांत माहुलकर, डॉ.सुनिता बाळापुरे, डॉ. विकास अडलोक,डॉ. पंकज मोरे, श्री. ज्ञानेश्वर बारस्कर, रेखा पुसतकर, विनायक पावडे, दिलीप पारवे, अनिल शेवतकर ,राहुल पांडे आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## २६ नोव्हेंबर ते ७ डिसेंबरदरम्यान पिकांचे नुकसान

### अवकाळीचा ६.३२ लाख हेक्टरला फटका;

### ६७२ कोटींची मागणी, विभागीय आयुक्तांचा प्रस्ताव



**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती-** नोव्हेंबरमधील अवकाळी पावसाने पश्चिम विदर्भात ११.१० लाख शेतकऱ्यांच्या ६.३२ लाख हेक्टरमधील खरीप, रब्बी, भाजीपाला व फळपिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झालेले आहे. पाचही जिल्ह्यांचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना शासन मदतीसाठी विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी ६७१.९२ कोटींची मागणी शासनाकडे केली.

२६ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर २०२३ दरम्यान अवकाळी पावसाची रिपरिप सुरू होती. यामध्ये सर्वाधिक २,१६,९७३ हेक्टरमध्ये कपाशीचे नुकसान झालेले आहे. अवकाळीमुळे फुटलेला कापूस बोंडातच भिजल्याने कापसाची प्रतवारी खराब झालेली आहे. याशिवाय अकोला जिल्ह्यात ३१५ हेक्टरमधील गहू जमीनदोस्त झाला. तसेच १.५४ लाख हेक्टरमधील तुरीचा फुलोरा गळला आहे.

रब्बी हंगामातील १.१७ लाख हेक्टरमधील हरभरादेखील अवकाळीने बाधित झाला. शिवाय सात हजार हेक्टरमधील ज्वारीचे नुकसान झालेले आहे. इतर काही पिकांचे ३२०० हेक्टर, असे एकूण ८.८३ लाख शेतकऱ्यांच्या जिरायती पिकांचे पाच लाख हेक्टरमध्ये नुकसान झालेले आहे. यासाठी ४२३.७६ कोटींच्या निधीची मागणी विभागीय आयुक्तांद्वारा शासनाकडे करण्यात आली.

## सहा जणांच इनकमिंग आणि २९ गुरुजींचे आउटगोइंग

### सहाव्या टप्प्यात ३५ शिक्षकांच्या बदल्या



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** राज्यातील विविध जिल्ह्यांतून आंतरजिल्हा बदली प्रक्रियेतून जिल्ह्यात नव्याने सहा शिक्षक येणार आहेत, तर २९ शिक्षक जिल्ह्यांतून इतर जिल्ह्यांत जाणार आहेत.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रिया ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे ३० डिसेंबर रोजी मध्यरात्री पूर्ण करण्यात आली. या बदली प्रक्रियेत शिक्षकांना सकाळी सुखद धक्का देत ईमेलवर बदली आदेश प्राप्त झाले आहेत. राज्यस्तरीय ऑनलाइन बदली पोर्टलवरून या बदल्यांवर शिक्कामोर्तब केले आहे. या वर्षीच्या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी अथवा नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला प्रत्यक्ष या बदल्या होतील. पंधरा दिवसांपासून आंतरजिल्हा बदली प्रक्रियेला सुरु होती. आंतरजिल्हा बदलीसाठी इच्छुक प्राथमिक शिक्षकांनी अर्ज केले होते. यामध्ये आंतरजिल्हा बदलीवर सहा शिक्षकांना स्वजिल्ह्यात येण्याची संधी मिळाली आहे; तर इतर जिल्ह्यातील अमरावती जिल्ह्यात कार्यरत असलेल्या २९ शिक्षकांना त्यांच्या जिल्ह्यात जाण्याची संधी या बदली प्रक्रियेत मिळाली आहे.या जिल्ह्यात बदली प्रक्रियेच्या सहाव्या टप्प्यात ३५ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

## वरुड येथे भव्य आमदार चषक चित्रकला स्पर्धा २०२४ चे आयोजन

### १० हजार पेक्षा जास्त विद्यार्थी रेखाटनार चित्र : उत्कृष्ट कलाकारांना आकर्षक बक्षिसे



**दि.३विदर्भ प्रजासत्ताक वरुड-** दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार मित्र परिवार द्वारा भव्य आमदार चषक चित्रकला स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागासह तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हि स्पर्धा ग्रामीण व शहरी अशा दोन गटात घेण्यात येणार आहे. त्यामध्ये शनिवार दि. १३ जानेवारी २०२४ रोजी ग्रामीण भागात तर रविवार दिनांक १४ जानेवारी, २०२४ रोजी शहरी भागात अशा दोन टप्प्यात भव्य आमदार चषक चित्रकला स्पर्धा २०२४ आयोजित करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शिकत असलेल्या शाळेत होणार असून वरुड शहरातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा स्थानिक न्यु इंग्लिश हायस्कुल वरुड, ता. वरुड, जि. अमरावती येथे भव्य प्रांगणात होणार आहे.

चित्रकला स्पर्धा सर्व विद्यार्थ्यांकरीता विनामुल्य राहणार असून चित्र रेखाटनाकरीता विनामुल्य ड्राईंग शीट पुरविल्या जाणार आहेत. यात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिस, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार असून प्रत्येक गटास प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे रोख रक्कम ३००१/- रुपये, २००१/- रुपये, १००१/- रुपये देण्यात येणार आहे. त्याशीय प्रोत्साहनपर बक्षिस सुध्दा देण्यात येणार आहे. यास्पर्धेचे बक्षिस वितरण गरुवार दि. ०१ फेब्रुवारी २०२३ रोजी आमदार श्री देवेंद्रजी भुयार यांचे कार्यालय वरुड येथे स. १०.०० वाजता होणार आहे. हि चित्रकला स्पर्धा संपूर्णत: विनामुल्य राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनदादा देशमुख तसेच मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्रजी भुयार उपस्थित राहणार आहे.

विशेष उल्लेखनिय कलाक्षेत्रात योगदान असलेल्या शिक्षकांना कलाश्री पुरस्काराने सम्मानित करण्यात येणार आहे. यास्पर्धेच्या अधिक माहिती करीता कला शिक्षक वसीम शेख सर, समीर गौस अली, किशोर देशमुख सर, निळकंठ नेरकर, शंकर पाटणकर, कपील तरार, रऊफ खान, शिवदास भंडारी, कुशल अंबाडकर, जगदीश लोखंडे, वैष्णवी राऊत आदींशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आता ग्रामीण भागातही इंटरनेट सुपरफास्ट चालणार

## इस्रो जीसॅट-२० उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करणार



**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

देशाच्या ब्रॉडबँड, इन-फ्लाईट व मेरिटाइम कम्युनिकेशन (आयएफएमसी) क्षेत्रातील वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी इस्रो या वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत जीसॅट-२० हा उपग्रह स्पेसएक्सच्या फाल्कन-९ या अग्निबाणाद्वारे अवकाशात प्रक्षेपित करणार आहे.

इस्रोची व्यावसायिक कंपनी असलेल्या न्यूस्पेस इंडिया लिमिटेडने (एनएसआयएल) बुधवारी ही घोषणा केली. जीसॅट-२० या उपग्रहाचे नाव बदलून जीसॅट-एन२ असे ठेवले जाणार आहे. अंदमान-निकोबार, लक्षद्वीपसह संपूर्ण देशात दूरसंचार क्षेत्रातील ब्रॉडबँड व अन्य गोष्टींच्या विस्तारासाठी हा उपग्रह अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे.

इस्रोच्या अवजड उपग्रहांचे जीएसएलव्ही-एमके३ या अग्निबाणाद्वारे प्रक्षेपण केले जाते. मात्र जीसॅट-२० हा ४७०० किलो वजनाच्या उपग्रह फाल्कन-९ या अग्निबाणाद्वारे अवकाशात झेपावणार आहे. एनएसआयएल व अमेरिकेच्या स्पेसएक्समध्ये झालेल्या करारानुसार हे प्रक्षेपण पार पडेल. भारताच्या ग्रामीण भागामध्ये ब्रॉडबँड सेवा, तसेच मोबाइलचे जाळे विस्तारण्यासाठी जीसॅट-२० उपग्रहाचा उपयोग होणार आहे.

# लोकसभेसाठी महायुतीने आखली संयुक्त रणनीती

## संक्रांतीला ११ मित्रपक्षांसह संयुक्त मेळावे



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

महायुतीतील तीन पक्षांचे आधीच मनोमीलन झाले, सरकारमध्येही तिघे व्यवस्थित बसले; पण आता गावोगावचे कार्यकर्ते, नेते यांचे मनोमिलन घडविले जाणार आहे. महायुतीतील ११ मित्रपक्षांचे संयुक्त मेळावे १४ जानेवारीला म्हणजे संक्रांतीच्या दिवशी होणार आहेत.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, शिवसेनेचे (शिंदे गट) मंत्री दादा भुसे यांनी बुधवारी याबाबत माहिती दिली. जिल्हा, तालुका, बुथस्तरापाठोपाठ विभागीय मेळावे होतील. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार मार्गदर्शन करतील, असे ते म्हणाले.

**महायुती राज्यात ४५+ जागा जिंकणार – तटकरे**

राज्यभर दौरा केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लाट पुन्हा एकदा दिसत आहे. महायुती राज्यात ४५ हून अधिक जागा जिंकेल. आम्ही किमान ५१ टक्के मते मिळवू, असा दावा बावनकुळे यांनी केला. तिन्ही पक्ष संपूर्ण ताकदीने निवडणुकीला सामोरे जातील, असे खा. तटकरे म्हणाले.

**तळागाळापर्यंत पोहोचणार – दादा भुसे**

शिवसेना नेते दादा भुसे म्हणाले, मोदी सरकारप्रमाणेच राज्यातील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अनेक विकासकामे केली आहेत. ही विकासकामे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी 'महायुती'च्या घटक पक्षांचे मेळावे होणार आहेत.

# आता यांनाच गुजरातला न्या...!

## ॲड. यशोमती ठाकूर यांचा उपरोधिक सल्ला



**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यातील अनेक उद्योग गुजरातला पाठवण्याची जणू स्पर्धा राज्य सरकार च्या नेत्यांमध्ये लागली आहे. हिरे उद्योगापाठोपाठ आता महानंददुग्ध प्रकल्पही गुजरातच्या दावणीला सरकारने बांधला आहे. यामुळे जर महाराष्ट्राचा विकास होईल, असा कुणाचा समाज असेल तर महायुतीच्या नेत्यांनाच एकदाचे गुजरातला घेऊन जा, म्हणजे काय तो विकास होईल, असा उपरोधिक सल्ला काँग्रेसच्या वरिष्ठनेत्या ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिला आहे.

काही दिवसापूर्वी मुंबईतील हिरे उद्योग गुजरात मधील सुरत येथे पाठवण्याचा 'उद्योग' महाराष्ट्र सरकारने केला. महाराष्ट्रातील महत्त्वाचे प्रकल्प हळूहळू गुजरातला स्थलांतरित होत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील रोजगार निर्मिती ढासळत चालली असून आधीच बेरोजगार असलेल्या युवकांच्या संख्येत मोठी भर पडत आहे. अशातच राज्य सरकारनें महानंद हा सहकारातला दुग्ध व्यवसायातील शिखर प्रकल्प गुजरातच्या दावणीला बांधण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रकल्प एनडीडीबी योग्यरीत्या चालवेल आणि पुन्हा महाराष्ट्राला परत देईल, असा भाबडा आशावाद राज्याचे दुग्धविकास मंत्री व्यक्त करीत आहेत. वास्तविक केंद्रात एनडीए सरकार आणि राज्यात महायुतीचे सरकार आल्यापासून सहकारी संस्था मोडीत काढल्या जात आहेत. शंभर वर्षांहून अधिक सहकाराची वैभवशाली परंपरा असलेल्या महाराष्ट्रातील सहकाराचे जाळे मोडून काढण्याचा चंगच या सरकारने बांधला आहे. जागतिक मंदीच्या काळातही गेल्या काही वर्षात ज्या सहकारामुळे महाराष्ट्र तग धरू शकला. तो सहकारच सरकार अशा पद्धतीने उध्वस्त करीत आहे. असा आरोप ॲड. यशोमती ठाकूर यांनी केला.

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार जी आणि स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी सहकारावर विशेष भर दिला. मात्र सहकारातील एकही संस्था चालवण्याचा अनुभव आणि कुवत त नसलेल्या या सरकारने महानंदप्रकल्पही गुजरात मध्ये नेऊन ठेवला. दिल्लीश्वरांची तळी उचलण्यात राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री धन्यता मानत आहेत. अशा पद्धतीने महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरात मध्ये नेऊन जर महाराष्ट्राचा विकास साध्य होणार आहे, असे कोणाला वाटत असेल तर त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पवार यांनाच गुजरातला नेऊन ठेवावे म्हणजे एकदाचा काय तो विकास होईल, अशा शब्दात ॲड. ठाकूर यांनी उपरोधिक टोला लगावला आहे.

# अमरावती जि.प.शिक्षक बँकेत पाच संचालकांवर अविश्वास ठराव मंजूर

## बँकेला आर्थिक अडचणीत आणण्याचा व सेवानिवृत्त सभासदांना अपात्र करण्याचा प्रयत्न त्या पाच संचालकांना भोवला

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती;**

अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेत सतत दीड वर्षापासून सत्ताधारी संचालक व पाच विरोधी संचालक यांच्यामध्ये कोणत्या ना कोणत्या कारणावरून घमासान सुरू होते. त्या पाच विरोधी संचालका विरुद्ध सहकार कायदा १९६० च्या कलम ७३ ( १) ड पोटकलम२० (२) नुसार ४जानेवारीला विभागीय सहनिबंधक यांनी बोलवलेल्या विशेष सभेत १६ विरुद्ध ५ मताने अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला. यामध्ये ज्यांनी अविश्वास ठराव दाखल केला होता त्यांच्या म्हणण्यानुसार शिक्षक बँकेच्या विकास कामात वारंवार अडथळा निर्माण करणे, बँकेला इतरत्र शाखा मिळू नये याकरिता रिझर्व बँकेकडे केलेल्या तक्रारी, सेवानिवृत्त सभासदांना लाभांश मिळू नये याकरिता तक्रारी करणे,बँकेच्या उपविधीत व कायद्यात नसतांना शिक्षक बँकेच्या जवळपास पंधराशे सेवानिवृत्त सभासदांना नाममात्र करून बँकेला एकाच दिवशी ६०ते ७० कोटी रुपयांनी मायनस मध्ये आणण्याचा प्रयत्न करणे. व त्यासाठी वारंवार तक्रारी करून कोर्टात केस दाखल करणे. बँकेच्या हितावह असणाऱ्या विविध ठरावांना हेतुपुरस्सर नामंजूर करणे. त्यामध्ये बँकेचे विद्युत देयक, कर्मचाऱ्यांचे पगार असो की नेट कनेक्टिव्हिटी असो यासारख्या ठरावांना सुद्धा नामंजूर करून बँकेला अडचणीत आणुन प्रभाकर झोड यांनी अध्यक्ष व संचालकांचा अंगावर खुर्ची उचलणे, ज्या विषयाशी तथाकथित संबंध नाही अशा विषयाच्या तक्रारी करून बँक प्रशासनाला गुंतवून ठेवणे. एकंदरीत संस्थेच्या विकासाला बाधा पोहचेल व सत्ताधारी संचालकांना कसं बदनाम करता येईल अशा पद्धतीने खोट्या तक्रारी करणे. रिझर्व बँकेने संचालकांना घालून दिलेले कोड ऑफ कन्डक न पाळणे. अशा अनेक विविध उपद्रवामुळे त्या ५ संचालकांवर आज सत्ताधारी गटाच्या १६ संचालकांनी अविश्वास ठराव मंजूर करत त्यांना बँकेच्या संचालक पदावरून दुर केले. त्या पाच संचालकांमध्ये प्रभाकर उत्तमराव झोड,संजय तुळशीराम नागे, मनोज रामचंद्र चोरपगार, मंगेश अरुणराव खेरडे, गौरव दामोदरपंत काळे यांचा समावेश आहे.

# तीन हजारावर विद्यार्थी यू-डायस प्लसपासून दूरच

## जिल्ह्यात ९९.२२ टक्के काम पूर्ण

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :**

यू-डायस प्रणालीवर असलेल्या सर्व मुद्द्यांची माहिती यूःडायस प्लस प्रणालीमध्ये वर्ग करण्याच्या सूचना शिक्षण संचालकांनी वारंवार दिल्या आहेत. मात्र, अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही. यू-डायस प्लसवर अद्यापही पाच लाख विद्यार्थी वर्ग करणे राहिले आहे. त्याचा मोठा परिणाम केंद्राकडून शिक्षण विभागाला मिळणाऱ्या निधीवर होणार आहे

यू-डायसची माहिती तपासून ती यू. डायस प्लसमध्ये वर्ग करण्याची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना वारंवार दिल्या होत्या, त्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली होती. या मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास केंद्राकडून मिळणाऱ्या निधीवरपरिणाम होणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हे काम ३१ डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना शिक्षण संचालकांनी शिक्षणाधिकाऱ्यांना दिल्या होत्या. मात्र, ३ जानेवारीपर्यंतही जिल्ह्यात हे काम पूर्ण झालेले नाही. अद्यापही जिल्हाभरात ३ हजार ६८९ विद्यार्थी यू- डायस प्लसच्या नोंदणीपासून दूरच आहेत. यू-डायस प्लसवर आजघडीला २९.२२ टक्के माहिती नोंदविली आहे.

# उन्हाळ्यापूर्वी कटाई, जलाईला वेग, वनरक्षकांची लगबग

## वन वणवा प्रतिबंधासाठी पट्टाकटाईच्या कामांना सुरुवात



### आपापल्या बीटनिहाय क्षेत्रात कामांना वेग

पोहरा बीट जंगलालगत अमरावती-चांदूर रेल्वे राज्य महामार्ग वर्दळीचा असल्याने या मार्गावरून ये जा करणाऱ्या प्रवाशांनी विडी, सिगारेटचे धुटुक फेकल्यास जंगलाला वनवा लागण्याची शक्यता असते. त्या अनुषंगाने उन्हाळ्यापूर्वीच सर्वप्रथम पोहरा बीट वनरक्षक हेमंत पांघरे, वनमजूर, संरक्षण मजूर यांनी आपले क्षेत्र पट्टा कटाई करून जाळरेषेसाठी तयार करणे सुरू केले.

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक पोहरा बंदी**

उन्हाळ्यातील संभाव्य वणवा नियंत्रणासाठी वडाळी आणि चांदूर रेल्वे या दोन्ही वन परिक्षेत्रातील वडाळी, पोहरा, बडनेरा, भातकुली, चिरोडी, चांदूर रेल्वे, माळेगाव या सातही वर्तुळाच्या बीटनिहाय पट्टाकटाईच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे.

उन्हाळ्यातील वणव्यांपासून जंगलाचे बचाव करण्यासाठी फायर लाइन तयार करणे ही नियमावलीच असल्याने चांदूर रेल्वे वन परिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार आणि वडाळी वन परिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिनस्थ वर्तुळ अधिकारी नंदकिशोर ठाकरे, रवी मुगल, किशोर धोत्रे, श्याम देशमुख, प्रकाश करे, बी.आर. पानसे,नीता नितनवरे यांनी आपापल्या वनरक्षक, वनमजूर, संरक्षण मजूर यांना आग नियंत्रणासाठी पट्टाकटाई व त्यानंतर पट्टा जलाईची जबाबदारी निश्चित केली आहे. या दोन्ही वन परिक्षेत्रात जंगलाच्या सीमेपासून आतील व बाहेरील रस्ता दुतर्फा सहा-सहा मीटरचे अंतर ठेवून कटर मशीनद्वारे पट्टाकटाईचे काम करण्यास वनपाल, वनरक्षक, वनमजूर, संरक्षक मजूर यांनी सपाटा चालविला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी या कामांना वेगाने प्रारंभ झाला आहे. उन्हाळ्यात जंगलांना सतत आगी लागण्याच्या मोठमोठ्या घटना घडतात. त्यामुळे जंगलांना लागणाऱ्या आगीत हजारो हेक्टर वनसंपत्तीचीराखरांगोळी होते. यामुळे वनव्यापासून जंगलाचे संरक्षण करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा वडाळी आणि चांदूर रेल्वे वन विभागाने पट्टा कटाई करण्यासाठी पावले उचलली आहेत. जंगलाच्या सुरक्षिततेसाठी वन विभागाची उपाययोजना रोपवन, कुरण विकास क्षेत्र, जंगलातील वनसंपत्तीचा उन्हाळ्यात लागणाऱ्या आगीपासून बचाव करण्यासाठी जंगलाच्या सीमेपासून आतील व बाहेरील रस्त्याच्या कडेपर्यंत सहा मीटर रुंदी व नियत क्षेत्राच्या सीमेपर्यंत लांबी ग्रास संभ कटर मशीनद्वारे पट्टावरील झाडी- झुडपे, गवत कटाई करून काही दिवसांनंतर त्या सुकलेल्या गवत, झाडीझुडपांना सायकलच्या टायर, ट्यूब गोळा करून त्याद्वारे जाळला जातो. ही जाळरेषा काढल्यानंतर आखणीनुसार एक काळा क्षार पट्टा तयार होतो.

# बिंदू नामावलीनंतर समायोजनावर विचार - परिवहन आयुक्त विवेक भिमनवार



**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

बिंदू नामावली तयार करून पदोन्नतीच्या संधी कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिल्यानंतरच अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समायोजनाबाबत सहानुभूतीने विचार करून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी कर्मचाऱ्यांना दिले. आयुक्त विवेक भिमनवार यांनी नुकतीच अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयाला भेट दिली. यावेळी मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी कर्मचारी संघटनेकडून त्यांचे स्वागत केले व कर्मचाऱ्यांच्या मागण्या संदर्भात चर्चा केली.राज्याच्या परिवहन विभागात सुधारित आकृतीबंधानुसार पदाचे फेरवाटप झाल्यामुळे लिपिक संवर्गातील पदांचे समायोजन करणेबाबत परिवहन विभागाचे आदेश नुकतेच प्राप्त झाले आहे, ज्यामूळे कर्मचारी वर्गात नाराजीचा सूर उमटला होता. या संदर्भात मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी परिवहन आयुक्तांना एका निवेदनाच्या माध्यमातून याबाबत कर्मचा:याचा सहानुभूतीने विचार करण्याची विनंती केली.

यावेळी बोलताना परिवहन आयुक्तांनी सांगितले की, सुरुवातीला बिंदू नामावली अद्यावत करुन पात्र कर्मचा:यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जाईल. त्यानंतरच अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समायोजनाबाबत सहानुभूतीने विचार करु, सोबतच या विभागातील कर्मचाऱ्यांना शक्यतो या विभागातच सामावून घेण्याचा प्रयत्न राहील असेही आश्वासन त्यांनी यावेळी दिले. आयुक्तांचे स्वागत करताना प्रादेशिक परिवहन अधिकारी राजाभाऊ गीते, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राज बागरी, जयश्री दुतोंडे, ज्ञानेश्वर हिरडे, प्रसाद गांजरे, सिद्धार्थ ठोके आदी अधिकारीवृंद व अनिल मानकर, अक्षय राठोड, आशिष माथूरकर, पराग जाधव, आशिष सोळंकी, देवानंद खंडारे, सुहास वानखडे, अरुण वाघमारे, अनिल मेश्राम, श्वेता वैद्य, रश्मी सोनार, दिपाली गवळी, सुहास वानखडे, समीक्षा वारकरी, दीपा पात्रे, संगीता बिलावेकर, रोहिणी दातार, शारदा हेडाऊ, साजिद अली, स्वप्नील खडसे, योगेश पुसनाके, देवेंद्र कळमकर, प्रमोद राजनेकर, विजय गावंडे, मनोज खोब्रागडे, प्रदीप गुडदे, मीनल गिरे, यशवंत रामटेके, नितेश चुलेट, धीरज गुल्हाने, संजय चौधरी, रमाकांत जोगेवार, ज्ञानेश्वर काळे, मनीषा भस्मे, साहेबराव कात्रे, आशिष प्रधान, देवराव मिरासे, प्रवीण मुंगळे, प्रीती मेहेत्रे, सुचिता होले, अश्विनी वानखडे यांच्यासह अन्य कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# पीक विमा कंपण्यांसमोर कृषी विभाग हतबल : खरीप रब्बीचा अजूनही परतावा नाहीच




कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असताना सहकार्य करण्यात येत नाही. ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनात आणून दिलेली आहे.

**– उज्चल आगरकर**
**उपसंचालक, कृषी विभाग**

### गतवर्षीचा परतावा मिळणार केव्हा ?

गतवर्षीच्या खरिपातील ७९,००२ शेतकऱ्यांना १२३ कोटींचा परतावा मंजूर करण्यात आलेला आहे. प्रत्यक्षातमिळालेला नाही. आंबिया बहरासाठी १५०० शेतकऱ्यांना सहा कोटींचा पीकविमा अद्याप मिळाला नाही. यंदा सोयाबीनसाठी ४१ महसूल मंडळांत जिल्हाधिकाऱ्यांनी अधिसूचना काढली व अग्रीम देण्याचे आदेशित केले. मात्र, कंपनी अपिलात गेलेली आहे.

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

पंतप्रधान पीक विमा योजना सध्या कृषी विभागासाठी अवघड जागेचे दुखणे ठरली आहे. सर्व प्रक्रिया कंपनी स्तरावर होत असल्याने त्या कंपन्या कुणालाच जुमानत नाहीत. सद्यःस्थितीत मागच्या हंगामातील खरीप, रब्बी व फळपिकांच्या आंबिया बहराचा परतावा कंपनीद्वारा शेतकऱ्यांना देण्यात आलेला नाही. त्यामुळे या कंपन्यांवर नियंत्रण कुणाचे, असा शेतकऱ्यांचा सवाल आहे.

खरीप हंगामापासून शेतकऱ्यांचा हिस्सा शासन भरणा करीत असल्याने योजनेत शेतकऱ्यांचा विक्रमी सहभाग लाभला आहे. या योजनेसाठी जनजागृतीशिवाय कृषी अधिकाऱ्यांना फारसा स्कोप नाही. जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र, अधिसूचना वआदेशालाही पीक विमा कंपन्या जुमानत नाहीत, यावर अपील करून टोलवाटोलवी करतात व शेतकऱ्यांच्या रोषाचा मात्र कृषी विभागाला सामना करावा लागत आहे.

खरीप व रब्बी हंगामांसाठी तीन वर्षांसाठी एकच विमा कंपनी आहे; परंतु फळपीक विम्यासाठी कंपनी दुसरी राहते. विशेष म्हणजे कंपनीचे जिल्हास्तरावरचे अधिकारी यांनाही कुठलाही निर्णय घेण्याचा अधिकारनाही, सर्व निर्णय कंपनी स्तरावर होत असल्याने शेतकऱ्यांचे बोल त्यांनाही ऐकावे लागत असल्याचे दिसून येते.

# अमरावतीमधून खा. नवनित राणांची उमेदवारी निश्चित

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा : ५१ टक्के मतांसह विजयी होतील असा विश्वास : चिन्ह, पक्ष कोणता हे मात्र अद्याप अस्पष्ट

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

लोकसभा निवडणुका जाहीर होण्यास काही महिन्यांचा अवधी राहिला असताना राजकीय पक्षांनी आघाड्यांनी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी या आघाड्यांमध्ये सरळलढत असणार आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुतीचा पहिला उमेदवार जाहीर केला आहे.



अमरावतीमधून बावनकुळे यांनी अपक्ष खासदार नवनीत राणा यांना उमेदवारी जाहीर केली आहे. एबीपी माझा या वृत्त वाहिनीच्या 'झिरो अवर' या कार्यक्रमात बोलताना भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी ही घोषणा केली.अमरावती लोकसभेत आपल्याकडे दोन आमदार असल्याचे सांगत एकीकड़े बच्चू कडू यांनी प्रहारला उमेदवारी मिळावी अशी मागणी केली. त्याशिवाय नवनीत राणा यांना जर उमेदवारी हवी असेल तर त्यांनी प्रहारकडून लढावं असंही कडू म्हणाले होते. त्यानंतर आता महायुतीतील प्रमुख पक्षाच्या अध्यक्षांनी नवनीत राणाया विजयी होतील असं म्हटल्याने राणा यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. 'झिरो अवर' या कार्यक्रमात बोलताना बावनकुळेयांनी महायुतीच्या नवनीत राणा या अमरावती मतदारसंघातून ५१ टक्के मतांसह विजयी होतील असा विश्वास व्यक्त केला.

### अपक्ष की कमळाच्या चिन्हावर?

नवनीत राणा या २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी आणि काँग्रेसच्या पाठिंब्यावर निवडणूक लढवली होती. त्यावेळी राणा यांनी शिवसेनेचे तत्कालीन खासदार आनंदराव अडसूळयांचा पराभव केला होता. त्याआधी राणा यांनी २०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवली होती.भाजप प्रदेशाध्यक्षभाजपप्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेयांनी महायुतीकडून नवनीत राणा या विजयी होतील असे म्हटले असले तरी नवनीतराणा लढणार कोणत्या पक्षाकडून हा मोठा प्रश्न आहे. राणा या भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याची चर्चा होती. तर, दुसरीकडे बच्चू कडू यांनीदेखील त्यांनी प्रहारच्या तिकीटावर निवडणूक लढवावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे उमेदवारी जाहीर झाली असली तरी चिन्ह, पक्ष कोणता असणार हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

# अमरावतीमधील पर्यटकांची ट्रॅव्हलर गाडी खेडनजीक मुंबई-गोवा महामार्गाच्या कठड्याला धडकून अपघातग्रस्त

## दहा जण जखमी सुदैवाने जीवित हानी नाही

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक खेड**

गोव्यामध्ये फिरण्यासाठी गेलेल्या अमरावतीमधील पर्यटकांची ट्रॅव्हलर गाडी खेडनजीक मुंबई-गोवा महामार्गाच्या कठड्याला धडकून दहा प्रवासी जखमी झाले. त्यातील आठ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना मुंबईला हलवण्यात आले आहे. बुधवारी, दि. ३ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.



घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, चालक शैलेश संपत बिरामणे (३२, रा. मुंबई) हा ट्रॅव्हलर (एमएच ४३ बीपी ६९०१) घेऊन गोव्याहून मुंबईच्या दिशेने जात होता. त्यावेळी ट्रॅव्हलरमध्ये संगीता नितीन रायचुरा (५४), अंजली सतीश सबसुळे (५२), संगीता ओमप्रकाश गोंधळे (४७), देवांशी जितेंद्र ठाकूर (१२), चेतना बाबालाल ठाकूर (४३), नितीन रायचुरा (५६), जितेंद्र लालसिंग ठाकूर (४४), सतीश विठ्ठलराव सबसुळे (५८), ओमप्रकाश गंगाराम गोंधळे (६०, सर्व रा. अमरावती) हे प्रवासी होते.

हे प्रवासी प्रथम मुंबईमध्ये आले. तेथून ते गोव्याला गेले. बुधवारी ते मुंबईच्या दिशेने परत निघाले असताना सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास खेड तालुक्यातील तुळशी ते खवटी गावांदरम्यान चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले व क्षणार्धात चारपदरी रस्त्यामधील दुभाजक ओलांडून ट्रॅव्हलर पलीकडच्या बाजूला जाऊन कठड्यावर धडकली. या अपघातात चालकासह दहा जण जखमी झाले. जखमींपैकी आठ जणांना डोके, हात, पाय, छातीला गंभीर दुखापत झाली असून, त्याच्यावर कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी मुंबई येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

शासनाची १०८ सेवा, शिवतेज आरोग्य सेवा संस्था, शिवसेना, प्रसिद्धी रुग्णवाहिका, जगद्गुरू नरेंद्र महाराज संस्थान नाणिजची रुग्णवाहिका यांच्यासह अनेक सामाजिक संस्थांच्या रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी पोहोचून जखमींना रुग्णालयात उपचारासाठी घेऊन गेल्या.

या अपघाताची माहिती मिळताच शिवसेनेचे तालुकाप्रमुख सचिन धाडवे, माजी नगरसेवक सतीश चिकणे, मिलिंद काते यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी व कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात पोहोचून जखमींची विचारपूस केली व त्यांना मदत केली.

कळंबणी येथे असलेल्या रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची वानवा प्रकर्षाने जाणवत होती. या ठिकाणी एकही ऑर्थोपेडिक सर्जन नसल्यामुळे मलमपट्टी करण्याखेरीज कोणतेही उपचार जखमींना मिळाले नाहीत.

# जनआरोग्य योजनांमध्ये वरूडचे रुग्णालय अव्वल

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक वरूड :**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये वरुड येथील ग्रामीण रुग्णालयाचा सन २०२३-२४ साठी जिल्ह्यातून एकमेव शासकीय रुग्णालय म्हणून राज्यात सर्वाधिक गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला.सन २०२३-२४ साठी अमरावती जिल्ह्यामधून एकमेव शासकीय रुग्णालय म्हणून राज्यात सर्वात जास्त गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटियार

आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकारी अविष्यांत पांडा यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार, वैद्यकीय समन्वयक डॉ. घनश्याम मानकर, आरोग्य सहायक सुनील वाडीकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य आरोग्य हमी सोसायटी मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, वाटरे, गजानन पांडे, डॉ. मटाले, डॉ. भिसे, डॉ. आवारे तसेच जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

## अभ्यासासह खेळाकडे लक्ष देणेही महत्वाचे

# अभ्यासाच्या ताणामुळे विद्यार्थ्यांचे मैदानी खेळांकडे पाय वळेना



**अरुण जोशी**

**दि४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अभ्यासाच्या ताणामुळे शालेय विद्यार्थ्यांचे पाय मैदानी खेळाकडे वळेनासे झाले आहेत. सकाळ- सायंकाळच्या सत्रात केवळ अभ्यासाचाच पाढा वाचला जात आहे. परिणामी आरोग्यासाठी उत्तम असणाऱ्या खेळाची अवस्था मात्र बिकट बनली आहे. त्यामुळे मैदाने काहीअंशी खुली राहत आहेत.

'साऊंड माइन्ड इन साऊंड बॉडी' असे म्हटले जाते. परंतू या म्हणीची अंमलबजावणी आता होत नाही. अमरावती जिल्ह्याला क्रीडाक्षेत्राची परंपरा आहे. कुस्ती, व्हॉलीबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल, कबड्डी यासह अन्य खेळांत अमरावती च्या खेळाडूंनी मैदान मारले आहे. मात्र, अभ्यासाच्या ताणामुळे सध्या बच्चेकंपनीला मैदानावर जायला पुरेसा वेळ मिळत नाही.

हुतांश विद्यार्थी अभ्यासातच व्यस्त असतात. त्यामुळे सकाळ-सायंकाळच्या सत्रात व्हॉलीबॉल मैदानावर खेळाडूंची संख्या घटत आहे. अभ्याससोबत खेळही तेवढेच महत्वाचे आहेत. पालकही खेळासाठी आग्रही असतात. मात्र, वेळेअभावी ते मैदानावर पाठवू शकत नाहीत. पाल्यांना प्रोत्साहीत करणे अंत्यत गरजेचे आहे.

**क्रीडा प्रशिक्षक,प्रमोद सोलीव,अमरावती**

### स्थूलता वाढली,दुर्लक्ष करू नका

सतत अभ्यासासाठी बैठक असल्याने विद्यार्थ्यांमध्ये



स्थूलतेचे प्रमाण वाढले आहे. त्यातच मोबाइलवेड्या मुलांना हा भ्रमणध्वनी एकाच ठिकाणी खिळवून ठेवत आहे. त्यामुळे मुलांच्या व्यायामाला खीळ बसली आहे.वैद्यकीय तज्ज्ञही याबाबत पालकांनी बालकंच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये असे सांगतात.

# २२ जानेवारी रोजी चौकाचौकांत होणार जल्लोष, भाजपचे पदाधिकाऱ्यांना निर्देश

## वस्त्यांमध्ये लावणार तोरण-झेंडे : संघ, विहिंपसोबत मिळून करणार नियोजन

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

२२ जानेवारी रोजी अयोध्येतील नवनिर्मित राममंदिरात रामलल्लाच्या मुर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार असून या दिवशी भाजपकडून जंगी जल्लोष करण्यात येणार आहे. शहरातील चौकाचौकात आतषबाजी करत अक्षरश: दिवाळी साजरी करण्याच्या सूचना भाजपच्या



पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. . राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे प्रत्येक भागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्यासोबत मिळून प्रत्येत चौक व वस्तीत भगवे झेंडे व तोरण लावत वातावरणनिर्मिती करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सर्वच मोठ्या चौकात जोरदार आतषबाजी करण्यात येणार आहे. यासाठी पक्षाचे सर्व मंडळ व आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना सखोल नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संघ व विहिंपतर्फे नागरिकांना घरोघरी जाऊन मंदिर अक्षता वाटप करण्यात येत आहे.

त्यांच्याप्रमाणे आता भाजपचे कार्यकर्तेदेखील गृहसंपर्क साधणार आहेत. निवडणूकांच्या तोंडावर भाजपसाठी गृहसंपर्क वाढविण्याची ही चांगली संधीदेखील मानण्यात येत आहे.

# अक्षता कलश यात्रेने धामणगावनगरी झाली श्रीराममय

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक धामणगाव रेल्वे :**

अयोध्या येथून आलेल्या अक्षतांची धामणगाव नगरीत शोभायात्रा काढण्यात आली. शेकडो महिला पुरुषांच्या व लहान बालकांच्या उपस्थितीने तसेच संपूर्ण शहर रांगोळ्या, भगव्या पताका तसेच पुष्पवृष्टीने जणू धामणगावनगरी श्रीराममय झाली होती. या अनुषंगाने अक्षतांच्या कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले. दत्तापुरातील श्री हिंगलाज माता मंदिर येथून प्रारंभ झालेली कलश यात्रा शहराच्या मुख्य मार्गाने कॉटन मार्केट, अमर शहीद भगतसिंग चौक, रेल्वे फाटक गांधी चौक, सिनेमा चौक, शास्त्री चौक, श्री छत्रपती शिवाजी चौक येथून श्री साईबाबा मंदिर येथे समारोप झाला, ज्या मार्गाने कलश यात्रा निघाली त्या सर्वच मार्गामध्ये ठिकठिकाणी अक्षत कलशांचे पूजन केले. शहरातील नागरिकांनी शोभायात्रेदरम्यान दूध व अल्पोपाहार तसेच अनेक वस्तूंचे वितरण मोठ्या प्रमाणात केले.

# विद्यार्थ्यांनो; शैक्षणिक शुल्क महाविद्यालयाला परत करा

## समाजकल्याण विभागाचे पत्र : रक्कम परत करण्यास सात दिवसांची मुदत

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील केंद्र शासनाच्या हिश्श्यातील ६० टक्के रक्कम महाडीबीटी प्रणालीतर्फे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. यातील शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, इतर ना परतावा विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयाच्या खात्यात सात दिवसांच्या आत जमा करावे, अन्यथा त्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यांवर राहणार असल्याचा इशारा २ जानेवारी २०२४ रोजी सहायक आयुक्त कार्यालय, समाजकल्याण विभाग जालना यांनी काढलेल्या पत्रातून दिला आहे.केंद्र शासनाकडून अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे. या योजनेंर्गत १७ मार्च २०२२ व ७ जुलै २०२३ च्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाची ६० टक्के हिश्श्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, इतर ना परतावा शुल्काची रक्कम संबंधित दिवसांपासून महाविद्यालयास सात दिवसांच्या आत जमा करायची असते. सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ वर्षातील केंद्र शासनाची ६० टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. काही विद्यार्थ्यांच्या खात्यात ती रक्कम जमा झाली आहे.

त्यामुळे सात दिवसांच्या आत शिक्षण, परीक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयात जमा करण्यात यावी, असे निर्देश समाजकल्याण विभागातर्फे देण्यात आले आहेत.

# ४९ दिवसांपासून संगणक परिचालकांचे 'कामबंद' सुरुच

## काम बंदमुळे ग्रामपंचायतचा कारभार ठप्प : नागरिकांची होतेय गैरसोय

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या संगणक परिचालकांच्या प्रलंबित विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राज्य संघटनेकडून मागील ४९ दिवसांपासून काम बंद आंदोलन सुरू असल्याने राज्यातील ग्रामपंचायत आपले सरकार सेवा केंद्रातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा दैनंदिन कारभार ठप्प झाला आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. याकडे मात्र शासन जाणीवपूर्वक कमालीचे दुर्लक्ष करीत आहे.

डिजिटल महाराष्ट्राचा कणा असलेला संगणक परिचालक मागील १२ वर्षांपासून ग्रामपंचायत स्तरावर अल्पशा मानधनावर गावातील नागरिकांना गावातच सेवा पुरविण्याचे काम प्रामाणिकपणाने करीत आहेत. ग्रामपंचायतीचे सर्व अभिलेखे संगणीकृत करणे, ११ आज्ञावलीतून ऑनलाइन कामे करणे, बिटूसी व महा ऑनलाइनच्या सर्व सुविधा पुरविणे, त्यासोबत केंद्र व राज्य शासनाच्या सर्व विभागातील विविध योजना संगणक परिचालक यांच्यामार्फत राबविल्या जातात. शासनाच्या प्रत्येक योजनेची माहिती थेट



नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम संगणक परिचालक करीत आहेत. मात्र, मागील १२ वर्षांपासून त्यांच्या मागण्या शासन दरबारी प्रलंबित आहेत. महागाईच्या काळात अल्पशा मानधनात कुटुंबाचा गाडा हाकणे शक्य नाही. त्यामुळे शासन व नागरिक यांच्यामधील दुवाअसलेल्या संगणक परिचालकांना यावलकर समितीच्या शिफारसीनुसार कर्मचारी दर्जा द्यावा, या मुख्य मागणीसह ४९ दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू आहे.

कामबंद आंदोलनाच्या काळात काही ग्रा. पं. मध्ये ग्रामसेवक, सरपंच खाजगी ऑपरेटर कडून कामे करून घेत आहेत. या काळात काही गैरप्रकार झाल्यास संगणक परिचालक जबाबदार राहणार नाही. यावलकर समितीच्या शिफारसीनुसार कर्मचारी दर्जा देऊन किमान वेतन देण्यात यावे, यासाठी राज्यभरात १७ नोव्हेंबरपासून कामबंद आंदोलन सुरु आहे. शासनाने संगणक परिचालकांचा जास्त अंत न बघता लवकरात लवकर निर्णय द्यावा.

**संगणक परिचालक**

### नागरिकांना भुर्दंड

आंदोलनामुळे ग्रा. पं. चा कारभार ठप्प झाला असून आपले सरकार सेवा केंद्रातून मिळणाऱ्या सुविधा बंद झाल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून शहराच्या ठिकाणी जाऊन आपले काम करावे लागत आहे. परिणामी नागरिकांना अधिकचा आर्थिक भुर्दड सहन करावा लागत आहे.